# प्रकरण ४ घटना दुरुस्त्या :
# स्वरूप आणि व्याप्ती

- प्रस्तावना
- भारतातील घटना दुरुस्तीची प्रक्रिया
- घटना दुरुस्तीचे प्रकार
- महत्त्वाच्या घटना दुरुस्त्या
- ४२ वी घटना दुरुस्ती
- ४४ वी घटना दुरुस्ती
- ४२ वी आणि ४४ वी घटना दुरुस्ती यामधील फरक
- ८६ वी घटना दुरुस्ती
- घटनेच्या मूळ चौकटीचा सिद्धांत

## प्रस्तावना

इंग्लंडमधील १६८८ गौरवमय क्रांती आणि १७८९ मधील फ्रेंच राज्यक्रांती यामुळे घटनांच्या विकासाला चालना मिळाली. सतराव्या शतकात इंग्लंडच्या राज्यघटनेचा आणि अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेच्या राज्यघटनेचा विकास झाला. या दोन राज्यघटना प्रमाण मानून जगातील इतर देशांच्या राज्यघटना निर्माण करण्यात आल्या. याशिवाय विसाव्या शतकाच्या प्रारंभी सोवियत रशियात साम्यवादी क्रांती १९१७ मध्ये घडून आली आणि तेव्हापासून रशियात साम्यवादी घटनेचा विकास झाला. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर जगातील अनेक देश स्वतंत्र झाले. या देशांनी इंग्लंड व अमेरिका या देशांना प्रमाण मानून आपल्या देशात घटनांचा स्वीकार केला. अशा प्रकारे आज एकविसाव्या शतकात काहीअपवाद वगळता जगातील सर्व देशांनी राज्यघटना स्वीकारली आहे.

राज्यघटना लिहिताना राज्यघटनेवर देशाच्या भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीचा परिणाम दिसून येतो. घटनाकारांवर प्रभावी असलेल्या विचारप्रणालीचे घटनेमध्येप्रतिबिंब पडत असते. राज्यघटना ही सरकारने बनवलेली नसून सरकार निर्माण करणाऱ्या लोकांनी म्हणजे लोकशाहीवादी देशांमध्ये लोकप्रतिनिधींच्या घटना समितीने बनवलेली असते. उदाहरणार्थ भारताची राज्यघटना बनविण्यासाठी सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्याद्वारे लोकप्रतिनिधींची निवड करून घटना समिती निर्माण केली आणि या लोकप्रतिनिधींनी म्हणजे घटना समितीच्या सदस्यांनी भारताची राज्यघटना तयार केली. ज्याप्रमाणे घटनाकार यांच्या विचारप्रणालीचा प्रभाव राज्यघटनेत दिसून येतो त्याप्रमाणे राष्ट्राची विचारप्रणाली राज्यघटनेत प्रतिबिंबित होताना दिसून येते. यावरून आपण उदारमतवादी राज्यघटना आणि साम्यवादी राज्यघटना असा राज्यघटनेमध्ये फरक करू शकतो. उदारमतवादी राज्यघटनांमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याला सर्वोच्च स्थान दिलेले असते. उदारमतवादी राज्यघटनांमध्ये व्यक्तीच्या कर्तव्यांपेक्षा हक्कांवर भर दिलेला असतो. उदारमतवादी राज्यघटनांमध्ये बदलत्या परिस्थितीनुसार बदल करणे शक्य आहे. जगातील अधिक राज्यघटना उदारमतवादी स्वरूपाच्या आहेत, ज्यामध्ये अमेरिका व इंग्लंड यांसारख्या राष्ट्रांच्या राज्यघटनांचा समावेश होतो.

तर दुसऱ्या प्रकारची राज्यघटना म्हणजे साम्यवादी राज्यघटना होय. आर्थिक समानता

आणि उत्पादनाच्या साधनांची समान मालकी या तत्त्वावर आधारलेल्या साम्यवादी राज्यघटनेचे प्रमुख उदाहरण म्हणजे रशियाची राज्यघटना होय. साम्यवादी राज्यघटनेत समान हे तत्त्व सर्वोच्च मानले जाते. यामध्ये व्यक्तीच्या अधिकारापेक्षा व्यक्तीचे कर्तव्य यांना जास्त महत्त्व दिले जाते. साम्यवादी राज्यघटना परिस्थितीनुसार बदल स्वीकारण्यात असमर्थ असतात. त्यामुळे साम्यवादी राज्यघटनेत बदल करण्याऐवजी त्या पुनर्लिखित लिखित केल्या जातात. सोव्हिएत रशियाच्या विघटनापूर्वी दर दहा वर्षांनी रशियाची राज्यघटना
पुनर्लिखित करण्याची तरतूद होती. साम्यवादी राज्यघटनेत दुरुस्ती करण्याऐवजी सरकार बदलले, की राज्यघटना बदलत असे. असा काळदेखील रशियात बघायला मिळाला. थोडक्यात साम्यवादी राज्यघटनेत परिस्थितीनुसार दुरुस्ती करणे अवघड असल्याने ती पुन्हा नव्याने निर्माण करण्यावर भर दिला जातो. म्हणजेच जैसे थे ची स्थिती निर्माण करण्यावर साम्यवादी राज्यघटना भर देत असल्याचे दिसून येते.

वरील बाबींचा विचार करता बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीमध्ये राज्यघटनेमध्ये बदल किंवा घटना बदल हे महत्त्वाचे असते कारण व्यवस्थेचे स्थैर्य हे यावरच अवलंबून असते. देशाच्या सर्वांगीण बदलत्या परिस्थितीमध्ये राज्यघटना बदलली नाही तर देशामध्ये राजकीय अस्थैर्यनिर्माण होण्याची शक्यता असते व त्यातून ती राजकीय व्यवस्था नष्ट होण्याची भीती असते. त्यामुळे राज्यघटना ही कोणत्याही स्वरूपाची असली तरी तिच्यामध्ये बदल करणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले व १९५० पासून राज्यघटना अमलात आणली गेली. तेव्हापासून आजतागायत ही राज्यघटना समर्थपणे टिकून आहे. मात्र राज्यघटना ज्या वेळी तयार केली गेली त्या वेळची परिस्थती वेगळी होती. त्यामुळे घटनाकारांवर काही मर्यादा येणे साहजिकच होते. मात्र बदलत्या काळानुसार घटनेत बदल झाले पाहिजेत, तरच तिचे मूल्य भारतीय जनतेत टिकेल हेही घटनाकार जाणून होते. त्यामुळे त्यांनी घटना
दुरुस्तीची तरतूद घटनेतच केलेली दिसून येते. मात्र असे असले तरीही एका बाजूला समाजाच्या आशा-आकांक्षा पूर्ण करत असताना सत्ताधाऱ्यांच्या लहरीनुसारही त्यांना वाटेल त्या पद्धतीने बदल होता कामा नये व राज्यघटनेचे मूल्यही टिकून राहावे या बाबींचा समन्वय राखत घटनाकारांनी भारतीय राज्यघटनेच्या कलम ३६८ मध्ये घटना दुरुस्तीचीतरतूद केली आहे. घटना दुरुस्तीच्या प्रक्रियेनुसार ताठर राज्यघटना आणि लवचिक राज्यघटना अशाही प्रकारे राज्यघटनांचे वर्गीकरण करता येते. जी राज्यघटना साध्या बहुमताने बदलली जाते तिला लवचिक राज्यघटना म्हणता येईल. उदा. इंग्लंडची राज्यघटना, तर घटना दुरुस्तीकरण्याची पद्धत जेव्हा अत्यंत क्लिष्ट असते तेव्हा तिला ताठर राज्यघटना म्हणतात. उदा.
अमेरिका.

## भरतातील घटना दुरुस्तीची प्रक्रिया

भारतीय राज्यघटनेने लवचिकता व ताठरता यांचा मेळ घातला आहे. भारतीय राज्यघटनेच्या भाग २० मधील कलम ३६८ मध्ये घटना दुरुस्ती प्रक्रिया सविस्तरपणे मांडलेली आहे. घटना दुरुस्तीची प्रक्रिया स्पष्ट केली आहे ती खालीलप्रमाणे.

१) घटना दुरुस्तीची प्रक्रिया संसदेच्या कोणत्याही सभागृहात विधेयक मांडून सुरू करता येते; परंतु राज्य विधिमंडळात असे विधायक मांडता येत नाही.

२) हे विधेयक मंत्री किंवा इतर सदस्य मांडू शकतात, त्यासाठी राष्ट्रपतीच्या पूर्व परवानगीची आवश्यकता नाही.

३) प्रत्येक सभागृहाने संबंधित विधेयक स्वतंत्ररीत्या संमत केले पाहिजे. एखाद्या विधेयकाबाबत दोन्ही सभागृहांमध्ये मतभेद निर्माण झाले, तर चर्चा करून विधेयक संमत करण्यासाठीच्या बाबत संसदेच्या संयुक्त बैठकीची तरतूद केली गेलेली नाही.

४) राज्यघटनेच्या संघराज्यात्मक तरतुदींमध्ये दुरुस्ती करणारे विधेयक असेल, तर त्या विधेयकाला निम्म्यापेक्षा अधिक घटक राज्यांतील विधिमंडळांनी साध्या बहुमताने मान्यता देणे आवश्यक आहे.

५) संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केल्यावर आणि आवश्यक तेथे राज्य विधिमंडळाने संमत केल्यावरच राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी विधेयक सादर केले जाते. राष्ट्रपतींनी घटना दुरुस्ती विधेयकाला मान्यता देणे बंधनकारक करण्यात आले आहे म्हणजे राष्ट्रपती विधेयक रोखून धरू शकत नाहीत किंवा संसदेच्या पुनर्विचारासाठी ते विधायक राष्ट्रपती माघारी पाठवू शकत नाहीत.(१९७१ सालच्या २४ व्या घटना दुरुस्तीने घटना दुरुस्ती विधेयकाला मंजुरी देण्याचे राष्ट्रपतींवर बंधनकारक
करण्यात आले आहे).

६) घटना दुरुस्तीची प्रक्रिया अत्यंत ताठरही नाही व अत्यंत लवचिकही नाही. यात काही विधेयके ही साध्या तर काही विशेष बहुमताने संमत करता येतात म्हणजे यात दोन्ही पद्धतींचा समन्वय साधण्यात आलेला आहे.

७) घटना दुरुस्तीच्या एकूण तीन पद्धतींची राज्यघटनेत तरतूद करण्यात आलेली आहे.

८) घटना दुरुस्तीची कलम १३(२) अंतर्गत येत नाही.

## घटना दुरुस्तीचे प्रकार

घटनेच्या कलम ३६८ मध्ये घटना दुरुस्तीच्या तीन प्रकारांची तरतूद केलेली आहे. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) संसदेच्या साध्या बहुमताने घटना दुरुस्ती :-**

या पद्धतीनुसार संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या साध्या बहुमताने घटनेतील काही तरतुदींमध्ये दुरुस्ती करता येते. खालील विषयांमध्येया प्रकारच्या दुरुस्त्या करता येतात. त्यामध्ये,

i. भारतीय संघराज्यात एखाद्या घटक राज्याचे विभाजन करून नवीन राज्याची निर्मितीकरणे.

ii. घटक राज्यांची नावे बदलणे.

iii.  राज्यांच्या सीमा बदलणे

iv. घटक राज्यांची नावे बदलणे.

v. घटक राज्यांच्या विधानपरिषद रद्द करणे किंवा स्थापन करणे.

vi. संसदेची गणपूर्ती.

vii. संसद सदस्यांचे वेतन आणि भत्ते.

viii. संसदेतील कामाकाजाच्या प्रक्रियेचे नियम ठरवणे.

ix. संसद, संसदेच्या समित्या व संसदेचे सदस्य यांचे विशेषाधिकार.

x. संसदेमध्ये इंग्रजी भाषेचा वापर.

xi. सर्वोच्च न्यायालयातील एकूण न्यायाधीशांची संख्या.

xii. सर्वोच्च न्यायालयाची कार्यकक्षा वाढविणे.

xiii. कार्यालयीन /अधिकृत भाषेचा वापर.

xiv. नागरिकत्व मिळवणे.

xv. संसद व राज्याच्या विधिमंडळाच्या निवडणुका.

xvi. प्रत्येक जनगणनेनंतर मतदार संघाची पुनर्रचना.

xvii. केंद्रशासित प्रदेशांच्या घटना.

xviii.परिशिष्ट पाच व परिशिष्ट सहा

**२) संसदेच्या विशेष बहुमताने :-**

राज्यघटनेतील बहुतेक तरतुदींमध्ये संसदेच्या विशेष बहुमताने दुरुस्ती करता येते म्हणजेच प्रत्येक सभागृहातील एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने आणि प्रत्येक सभागृहातील उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांश बहुमताने संमत करणे आवश्यक आहे. यामध्ये पुढील विषयांचा समावेश होतो,

i. व्यक्तीचे मूलभूत हक्क

ii. राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

iii. साध्या बहुमताने आणि विशेष बहुमतासाहित किमान निम्म्यांपेक्षा जास्त राज्यांची संमती या दोन प्रकारांत न येणाऱ्या घटना दुरुस्त्यांचा समावेश यामध्ये होतो.

३) संसदेच्या विशेष बहुमताने व राज्याच्या संमतीने :-

काही घटना दुरुस्त्यांसाठी संसदेच्या विशेष बहुमता बरोबरच किमान निम्म्यापेक्षा अधिक राज्य विधिमंडळाच्या साध्या बहुमताने त्यास मान्यता देणे आवश्यक आहे. ज्या वेळेस संसद आणि निम्म्या पेक्षा जास्त विधिमंडळे मान्य करतील त्या वेळी औपचारिक प्रक्रिया पूर्ण होईल. अशा विधेयकाला राज्यांना मान्यता देण्यासाठी कोणतीही कालमर्यादा नाही. खालील तरतुदींमध्येया प्रकाराने दुरुस्ती करता येईल.

i. भारताच्या राष्ट्रपतीची निवडणूक व या निवडणुकीची प्रक्रिया पद्धत

ii. भारतीय संघराज्य आणि राज्य या दोहोंच्या कार्यकारी अधिकाराची व्याप्ती

iii. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये

iv. संघराज्य आणि घटक राज्य यांच्यात वैधानिक अधिकारांची विभागणी

v. परिशिष्ट ७ मधील कोणतीही सूची

vi. संसदेमध्ये राज्यांचे प्रतिनिधित्व

vii. घटना दुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार

viii. घटना दुरुस्तीची प्रक्रिया

## महत्त्वपूर्ण घटना दुरुस्त्या

भारतीय राज्यघटनेचा जेव्हा स्वीकार केला गेला तेव्हा तिच्यामध्ये एकूण ३९५ कलमे, आठ परिशिष्टे, आणि बावीस भाग होते. तर २०१६ च्या अखेरीस भारतीय राज्यघटनेत एकूण ४६५ कलमे, १२ परिशिष्टे, २५ भाग व एक सरनामा इत्यादींचा समावेश केला गेलेला आहे.भारतीय राज्यघटना अमलात आल्यापासून एका वर्षात म्हणजे १९५१ मध्येप्रथम घटना दुरुस्ती करण्यात आली. राज्यघटना लागू झाल्यापासून पहिल्या दशकात म्हणजे १९५०-६०च्या दरम्यान नऊ घटना दुरुस्त्या करण्यात आल्या. तर १९६०-७० च्या दशकात १४ घटना दुरुस्त्या केल्या. १९७०-८० च्या दशकात २२ घटना दुरुस्त्या करण्यात आल्या. यावरून असे दिसते, की भारतीय संसदेने कलम ३६८चा मोठ्या प्रमाणात वापर केला आहे. राज्यघटना लागू झाल्यापासून पासष्ट वर्षांत म्हणजेच २०१८ पर्यंत भारतीय राज्यघटनेत तब्बल १०४ वेळेस दुरुस्त्या करण्यात आल्या. या सर्व दुरुस्त्यांपैकी काही महत्त्वाच्याघटना दुरुस्त्या आपण पुढीलप्रमाणे स्पष्ट करू शकतो.

## ४२ वी घटना दुरुस्ती अधिनियम १९७६

आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर तयार करण्यात आलेल्या या घटना दुरुस्तीचे वैशिष्ट्यअसे, की आजपर्यंत करण्यात आलेल्या अनेक घटना दुरुस्त्यांपैकी ही सर्वांत मोठी व सर्वंकष स्वरूपाची घटना दुरुस्ती आहे. या घटना दुरुस्तीचे वर्णन छोटी राज्यघटना किंवा मिनी कॉन्स्टिट्यूशन असेदेखील केले जाते कारण राज्यघटनेतील जवळपास चाळीस कलमांत या घटना दुरुस्तीने बदल घडवून आणले. त्यात चार जुनी कलमे रद्द करून त्याऐवजी नव्या कलमांचा समावेश केला गेला, तर तेरा पूर्णतः नवीन कलमे व दोन नवीन भागांचा समावेश केला गेला. तसेच या घटना दुरुस्तीद्वारे स्वर्णसिंह समितीच्या शिफारशीलागू करण्यात आल्या. तत्कालीन राजकीय परिस्थितीचादेखील या घटना दुरुस्तीवर प्रभाव पडल्याचे दिसून येते. यामधील तरतुदी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

अ) घटनेच्या सरनाम्यामध्ये समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि अखंडता हे तीन नवीन शब्द समाविष्ट करण्यात आले.

आ) नागरिकांचे मूलभूत कर्तव्य राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले. त्यासाठीराज्यघटनेत नवीन भाग **IV**अ कलम ५१ अ समाविष्ट करण्यात आला.

इ) पंतप्रधान व त्यांच्या मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक करण्यात आला. कलम ७४ **.**

ई) प्रशासकीय न्यायाधिकरण आणि इतर बाबींसाठी न्यायाधिकरण यांची तरतूद करण्यात आली. यासाठी नवीन भाग १४ अ समाविष्ट करण्यात आला .

उ) कलम ३६८ नुसार संसदेचा घटना दुरुस्तीचा अधिकार न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आला.

ऊ) सर्वोच्च न्यायालयाचे आणि उच्च न्यायालयाचे न्यायालयीन पुनर्विलोकनाचे आणि प्राथमिक व प्राधिलेख काढण्याचे अधिकार क्षेत्र मर्यादित करण्यात आले.

ऋ) कलम ८६ व कलम १७२ मध्ये बदल करून लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभा यांचा कार्यकाल पाच वर्षांवरून सहा वर्षांपर्यंत वाढवण्यात आला.

ऌ) मूलभूत हक्कांच्या संदर्भात दोन बदल केले गेले.

१**)** कलम ३१ क यात बदल करून मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठीकेलेले कायदे काही मूलभूत अधिकारांचे उल्लंघन केल्याच्या कारणावरून न्यायालय अवैध ठरवू शकत नाही.

२) कलम ३१ ड चा समावेश करून देशाच्या विरोधी केल्या जाणाऱ्या कारवायांना आणि संस्थांना प्रतिबंध घालण्याचा अधिकार संसदेस असेल व तो न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या कक्षेबाहेर असेल अशी तरतूद करण्यात आली.

ऍ) भारताच्या एखाद्या क्षेत्रात राष्ट्रीय आणीबाणी घोषित करणे सुकर करण्यात आले.

ऐ) राज्यातील राष्ट्रपती राजवटीचा कालावधी एका वेळेस सहा महिन्यांऐवजी एका वर्षाने वाढविण्यात येण्याची तरतूद करण्यात आली.

ए) एखाद्या राज्यात कायदा व सुव्यवस्थेची समस्या निर्माण झाल्यास तेथील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळण्यासाठी त्या राज्यात सशस्त्र दल पाठवण्याचा अधिकार केंद्राला देण्यात आला.

ऐ) संसदेत व विधानसभेत गणपूर्तीची आवश्यकता रद्द करण्यात आली.

ऑ) संसद सदस्य आणि संसदेच्या समित्या यांचे अधिकार व विशेषाधिकार वेळोवेळी ठरविण्याचे अधिकार संसदेला देण्यात आले.

ऑ) अखिल भारतीय न्यायिक सेवा निर्माण करण्यात आली.

ओ) मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नवीन चार तत्त्वांचा समावेश करण्यात आला.

१) बालकांच्या आरोग्यपूर्ण विकासाची संधी याची शाश्वती देणे. (कलम ३९)

२) समान न्याय व गरिबांसाठी निःशुल्क कायदेशीर सेवा यांना चालना देणे.(कलम ३९ अ)

३) औद्योगिक व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग निश्चित करण्यासाठी उपाययोजना करणे. (कलम४३अ)

४) पर्यावरण सुधारणे व त्याचे संरक्षण करणे. तसेच वने व वन्यजीव यांचे संरक्षण करणे. (कलम ४८ अ)

औ) या घटना दुरुस्तीने राज्य सूचीतील पाच विषय शिक्षण, वने, वजने व मापे, जंगली पशु-पक्ष्यांचे संरक्षण, न्यायिक प्रशासन यांचा समवर्ती सूचीत समावेश केला गेला. या घटना दुरुस्तीने जास्तीत जास्त सत्ता ही केंद्राकडे एकवटण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्याचा परिणाम केंद्र - राज्य यांच्या संबंधावर होताना दिसून येतो. तसेच कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांच्यातील संतुलन बिघडविण्याचा प्रयत्न केला. या घटना दुरुस्तीने राज्यघटनेत तोडफोड करण्याचाही प्रयत्न केला.

## ४४ वी घटना दुरुस्ती अधिनियम १९७८

४२ वी घटना दुरुस्ती अधिनियमान्वये घटनेत समाविष्ट करण्यात आलेले आणखी काही विपर्यास दूर करण्यासाठी मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील जनता सरकारने ४४ वी घटना दुरुस्ती अधिनियम १९७८ पारित केला. त्यातील काही तरतुदी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

अ) ४२ व्या घटना दुरुस्तीने लोकसभा-विधानसभा यांचा जो सहा वर्षांपर्यंत वाढवला होता तो पाच वर्ष हा मूळ कार्यकाल पुनर्स्थापित करण्यात आला.

आ) लोकसभा आणि विधानसभा यांच्या गणपूर्तीच्या आवश्यकतेची तरतूद पुनर्स्थापित

करण्यात आली.

इ) संसद आणि राज्य विधिमंडळाच्या कामकाजासंबंधी वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या कामकाजाविषयी घटनात्मक संरक्षण दिले गेले. कलम ३६१ अ .

ई) पंतप्रधान व त्यांच्या मंत्रिमंडळाने राष्ट्रपतींना दिलेला सल्ला एकदा पुनर्विचारार्थ परत पाठविण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला. मात्र मंत्रिमंडळाने पुनर्विचार करून दिलेला सल्ला मानणे राष्ट्रपतींवर बंधनकारक करण्यात आले.

उ) अध्यादेश काढण्यासंदर्भात राष्ट्रपती, राज्यपाल आणि प्रशासक यांचे समाधान हे अंतिम होय अशा आशयाची तरतूद वगळण्यात आली.

ऊ) राष्ट्रीय आणीबाणीच्या संदर्भात अंतर्गत अशांतता याऐवजी सशस्त्र बंडाळी हा शब्दप्रयोग करण्यात आला.

ऋ) मंत्रिमंडळाच्या लिखित शिफारशीनुसारच राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणी घोषित करतील अशी तरतूद करण्यात आली.

ऌ) मालमत्तेचा हक्क हा मूलभूत हक्कांच्या यादीतून (कलम ३१) वगळण्यात आला व तो केवळ कायदेशीर अधिकार (कलम ३०० अ) करण्यात आला.

ऍ) राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात कलम २० व कलम २१ मध्ये हमी दिलेले मूलभूत हक्क नियमित करता येत नाही तशी तरतूद करण्यात आली.

ऐ) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व लोकसभेचा सभापती यांच्या निवडणूक संदर्भातील विवादावर निर्णय घेण्याचा न्यायालयाचा अधिकार काढून घेणारी तरतूद करण्यात आली.

## ४२ वी ४४ वी घटना दुरुस्ती यांमधील फरक

१) ४२ व्या घटना दुरुस्तीने केंद्र सरकारला कलम ३६८ अंतर्गत त्यांच्या मर्जीप्रमाणे घटना दुरुस्ती करण्याचा अधिकार बहाल केला होता, तर ४४ व्या घटना दुरुस्तीने या अधिकारावर परत मर्यादा घातल्या गेल्या.

२) उच्च न्यायालयाचे अधिकार ४४ व्या घटना दुरुस्तीने त्यांना परत देण्यात आले. तसेच कलम २२६ अंतर्गत मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणी बरोबरच इतर हक्कांसाठी घटनात्मक उपाययोजना याला संमती दिली.

३) ४४ व्या घटना दुरुस्तीने राष्ट्रीय आणीबाणीच्या व्याख्येत सुधारणा केली. भविष्यात कलम ३५२ चा गैरवापर होऊ नये ही भूमिका यामागे होती.

४) ४२ व्या घटना दुरुस्तीने राष्ट्रपतींवर मंत्रिमंडळाचा निर्णय बंधनकारक होता मात्र
४४ व्या घटना दुरुस्तीने यात थोडा बदल करून मंत्रिमंडळाच्या सल्ल्याचा एकदा पुनर्विचार करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना प्रदान करण्यात आला.

५) संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मान्यता दिल्यास आणीबाणी सहा महिन्यांपर्यंत लागूअसते व दर सहा महिन्यांनी संसदेची मान्यता घेऊन अनिश्चित काळापर्यंत हीआणीबाणी वाढवली जाऊ शकते. ही तरतूद ४४ व्या घटना दुरुस्तीत करण्यात आली.

६) राष्ट्रीय आणीबाणी घोषित केल्यापासून एका महिन्याच्या कालावधीत संसदेच्या दोन्ही सभागृहांनी तिला मान्यता दिली पाहिजे. सुरुवातीला संसदेची मान्यता मिळवण्याचा कालावधी दोन महिने होता; परंतु ४४ व्या घटनादुरुस्तीने तो एक महिना करण्यात आला.

## ८६ वी घटना दुरुस्ती अधिनियम २००२

या घटना दुरुस्तीत पुढीलप्रमाणे तरतुदी करण्यात आल्या आहेत.

अ) प्राथमिक शिक्षण हा मूलभूत अधिकार करण्यात आला. ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना राज्य ठरवतील त्या पद्धतीने राज्य मोफत व अनिवार्य शिक्षण देण्याची तरतूद करेल. असे नव्याने समावेश केलेल्या कलम २१ अ मध्ये म्हटले आहे.

आ) मार्गदर्शक तत्त्वांच्या कलम ४५ च्या विषयात बदल करण्यात आला. सहा वर्षपूर्ण होईपर्यंत सर्व बालकांचे संगोपन व शिक्षण देण्याची तरतूद करण्याचा राज्य प्रयत्न करेल असे आता त्या कलमात म्हटले आहे.

इ) कलम ५१अ मध्ये नव्या मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला. आई-वडील व पालक असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी आपल्या ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी हे त्यांचे कर्तव्य आहे. अशा प्रकारे आपल्याला काही महत्त्वपूर्ण घटना दुरुस्तीची माहिती घेता येईल. आतापर्यंत झालेल्या अनेक घटना दुरुस्तींपैकी या काही महत्त्वपूर्ण घटना दुरुस्ती होत्या. ४२ वी घटना दुरुस्ती अत्यंत महत्त्वाची व्यापक व सविस्तर अशी आहे. घटना दुरुस्तीची प्रक्रिया अत्यंत उपयुक्त आणि परिस्थितीशी जुळवून घेणारी असली तरीही त्यातील काही त्रुटी असतात. घटना दुरुस्तीवरील काही ठिकाणांची माहिती पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

## घटना दुरुस्ती प्रक्रियेचे टीकात्मक परीक्षण :-

१) राज्यघटनेमध्ये दुरुस्ती करण्यासाठी भारतामध्ये अमेरिकेप्रमाणे घटना परिषद किंवा घटना सभा अशा विशेष संस्थांची व्यवस्था नाही. घटना दुरुस्तीचा अधिकार संविधानाने संसदेला सोपविला आहे. अगदी काही बाबतीत सदर अधिकार राज्य
विधिमंडळाला आहेत.

२) घटना दुरुस्ती विधेयकाबाबत कोंडी निर्माण झाल्यास संसदेच्या दोन्ही सभागृहांचीसंयुक्त बैठक घेण्याची तरतूद नाही. मात्र साध्या विधेयकाबाबत संयुक्त बैठक घेण्याची तरतूद आहे.

३) घटना दुरुस्तीची प्रक्रिया कायदे करण्याच्या प्रक्रियेसारखीच आहे. विशेष बहुमताची तरतूद सोडून कायदेमंडळ घटना दुरुस्ती विधेयक इतर विधेयकांसारखेच संमत करते.

४) घटना दुरुस्ती प्रक्रियेबाबतच्या तरतुदी स्पष्ट नाहीत. त्यामुळे या बाबीन्यायव्यवस्थेकडे नेण्यास खूप वाव आहे.

५) घटना दुरुस्तीची प्रक्रिया सुरू करण्याचा अधिकार फक्त संसदेला आहे.

६) राज्य विधिमंडळानी किती कालावधीत घटना दुरुस्ती विधेयक संमत करावे याचीमर्यादा राज्यघटनेत सांगितलेली नाही.

अशा पद्धतीने भारतीय राज्यघटनेचे टीकात्मक परीक्षण करता येते. मात्र तरीही याच अधिकाराच्या माध्यमातून संसदेने घटनेचे अस्तित्व व मूल्य टिकवून ठेवलेले दिसते. प्रातिनिधिक लोकशाही असलेल्या भारतात संसद ही भारतीय जनतेचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे समाजाच्या बदलत्या काळातील आशा– आकांक्षा पूर्ण करण्याचे कार्य संसद या माध्यमातून करताना दिसून येते. याच अधिकाराच्या माध्यमातून भारतीय लोकशाहीअधिकाधिक श्रेयगर्भ होताना दिसते. त्यामुळे या घटना दुरुस्तीचे महत्त्व नाकारता येत नाही.

## राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीचा सिद्धांत / राज्यघटनेचा मूळ गाभा

राज्यघटनेनुसार संसद व राज्य विधिमंडळ त्यांच्या कार्यक्षेत्रात कायदे करू शकतात. तसेच राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा अधिकार केवळ संसदेस आहे, राज्य विधानसभेस नाही. राज्यघटनेच्या कलम ३६८ नुसार संसदेला घटना दुरुस्तीचा अधिकार दिला गेलेला आहे. मात्र तरीही हा अधिकार अमर्याद नाही. संसदेने केलेला कायदा हा घटनात्मक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अंतिम अधिकार सर्वोच्च न्यायालयाचा आहे.

राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीच्या सिद्धांतानुसार घटनेची मूलभूत चौकट किंवा संरचना बदलण्याचा प्रयत्न करणारी दुरुस्तीही अवैध ठरवली जाते. महत्त्वाचे म्हणजे भारतीय संविधानात कोठेही मूलभूत संरचना या शब्दाचा उल्लेख आढळत नाही. संविधानाच्या घटनेच्या मूलभूत रचनेत बदल करणारे कायदे करू शकत नाही. ही संकल्पना काळाच्या ओघात हळूहळू विकसित झालेली आहे. यामध्ये भारतीय लोकशाहीचे स्वरूप जपणे लोकांचे हक्क स्वातंत्र्य यांची जपवणूक करणे महत्त्वाचे ठरते.

१९७३ झालेल्या केशवानंद भारती खटल्यांमध्ये घटनेच्या मूलभूत चौकटीचा किंवा मूळ गाभा याचा उल्लेख आढळतो. घटना दुरुस्ती करूनसुद्धा घटनेची मूलभूत रचना रद्द केली जाऊ शकत नाही. या निर्णयामध्ये घटनेच्या काही मूलभूत तत्त्वांची यादी करण्यात आली.

१) घटनेचे श्रेष्ठ स्थान

२) वैयक्तिक स्वातंत्र्य

३) घटनेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप

४) राज्यघटनेचे संघराज्यीय स्वरूप

५) लोकशाही आणि प्रजासत्ताक शासन

६) भारताची एकता आणि सार्वभौमत्व

कालांतराने आणखी काही तत्वांचा मूलभूत संरचनेत समावेश करण्यात आला.

१) कायद्याचे राज्य

२) संसदीय शासनप्रणाली

३) समानतेचा नियम

४) मूलभूत हक्क व राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक
तत्त्वेयांच्यामधील संतुलन

५) निःशुल्क आणि निष्पक्ष निवडणुका

६) कलम ३२, १३६, १४२, १४७ अंतर्गत सर्वोच्च
न्यायालयाचे अधिकार

७) कलम २२६, २२७ अंतर्गत उच्च न्यायालयाचे
अधिकार

## केशवानंद भारती खटला १९७३

हा खटला म्हणजे भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत संरचना सिद्धांतास परिभाषित करणारी सर्वांत महत्त्वाची घटना होती. सदर खटल्यात २४ व २५ व्या घटना दुरुस्तीला आव्हानीत केले गेले होते. या खटल्याच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा अर्थ असा होता, की संसद केवळ घटनेत बदल करू शकते; पण घटनेची मूळ संरचना संसदेस बदलता येणार नाही. भारतीय कायदे निर्मिती प्रक्रियेतील हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ज्यात संसदेने संविधानाच्या मूलभूत संरचनेला बाधा आणल्यास न्यायालय त्यास प्रतिकार करू शकते.

इंदिरा गांधी विरुद्ध राज नारायण खटला १९७५ सदर खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने अशी भूमिका घेतली की, सर्वोच्च न्यायालयाने १९७५ सालची ३९ वी घटना दुरुस्ती जिने ३२९अ चा समावेश केला होता, यातसुद्धा मूलभूत संरचनेचा उपयोग केला. एकोणचाळिसावी घटना दुरुस्ती आणीबाणीच्या काळात झाली होती. यामध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभा सभापती यांच्या निवडणुका न्यायालयीन कक्षेच्या बाहेर ठेवल्या गेल्या होत्या; पण सर्वोच्च न्यायालयाने हे मूलभूत संरचनेच्या विरोधी आहे असे स्पष्टीकरण दिले.

मिनर्व्हा मिल्स खटला १९८०- या खटल्याने मूलभूत संरचनेला अधिक मजबूत केले. या प्रकरणात न्यायालयाने मूलभूत संरचनेच्या यादीमध्ये दोन वैशिष्ट्यांचा समावेश केला. एक न्यायालयीन पुनर्विलोकन व दोन मूलभूत हक्क व राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे यांच्यामध्ये संतुलन प्रथापित करणे. या निर्णयामुळे हे स्पष्ट झाले, की संसद सर्वोच्च नाही तर राज्यघटनेची मूलभूत संरचनाही महत्त्वाची आहे. त्यामुळे या माध्यमातून सर्वोच्च न्यायालय कायदेमंडळाच्या कलम ३६८ च्या आवश्यकतेपेक्षा अतिरिक्तच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करते.

## सारांश

एकूणच भारतीय घटना दुरुस्तीच्या प्रक्रियेचे अध्ययन करता असे स्पष्ट होते, की भारतीय राज्यघटना ही अत्यंत प्रवाही ठेवण्याचे कार्यया कलम ३६८ ने केले आहे व तेही अत्यंत समन्वयात्मक प्रक्रियेने कारण ही राज्यघटना अंशतः ताठर व अंशतः लवचिक असल्यामुळे ती एका बाजूला भारतीय समाजाच्या आशा- आकांक्षा पूर्ण करण्याचे कार्य करते, तर घटनेला सत्ताधाऱ्यांच्या हातातील बाहुले बनू देत नाही.तसेच मूलभूत चौकटीच्या सिद्धांतामुळे या अधिकारावर मर्यादा घातल्या गेल्या आहेत त्यातून न्यायालय घटनेचे संरक्षण करते. असे असले तरीही भारतीय राज्यघटना एक जिवंत दस्तऐवज वाटतो. ग्रॅनव्हील ऑस्टीन यांच्या मते घटना दुरुस्ती प्रक्रिया ही राज्यघटनेची सक्षम परिपूर्ण बाजू आहे. हीगुंतागुंतीची वाटत असली तरी ती केवळ भिन्न बाब आहे.